# टागोर यांच्याबद्दल महाराष्ट्रात अभ्यास कमी

## केंद्रीय नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांची खंत

**पुणे, ता. ७ :** ''गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांचा महाराष्ट्राशी दीर्घकाळ ऋणानुबंध असूनही त्यांच्याबद्दल येथे फारसा अभ्यास झालेला नाही, त्यांचे अनेक पैलू येथील नागरिकांना अद्याप अपरिचित आहेत,'' अशी खंत केंद्रीय नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी वसंत व्याख्यानमालेत व्यक्त केली.

'गुरुदेव रवींद्रनाथ टागोर : एक अमर्याद पुरुषोत्तम' या विषयावरील व्याख्यानात डॉ. जाधव बोलत होते. ते म्हणाले, ''रवींद्रनाथांनी साहित्य, संगीत व कला क्षेत्रात अपूर्व योगदान दिले आहे. त्यामुळे ते युगनिर्माते होते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. महाराष्ट्रावर त्यांचे अपरंपार प्रेम होते. महात्मा गांधी व त्यांच्यात मतभेद असून त्यांचा परस्परांवर स्नेह होता. त्याचप्रमाणे लोकमान्य टिळक व त्यांच्यातही एक अनामिक नाते होते.''

''टिळकांनी महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केल्यावर १९०४ मध्ये शंकर गणेश देऊसकर यांनी कोलकत्यात 'शिवउत्सव' सुरू केला होता. त्यातील पहिले व्याख्यान रवींद्रनाथांनी दिले होते. त्यात त्यांनी शिवाजी महाराजांवर कविता केली होती. त्याचप्रमाणे रवींद्रनाथ हे संत तुकाराम महाराजांचेही भक्त होते. ते व त्यांचे बंधू सत्येंद्रनाथ यांनी संत तुकारामांच्या ओव्यांचा अभ्यास केला होता. रामशास्त्री प्रभुणे यांच्यावरही रवींद्र नाथांनी कविता केली होती,'' असे डॉ. जाधव यांनी नमूद केले. सुरेश पिंगळे यांनी प्रास्ताविक केले.

सकाळ ८/७/११

# Top French honour for Narendra Jadhav

**Mumbai:** Renowned economist and Planning Commission member Narendra Jadhav has been honoured with the "Commander dans l'Ordre des Palmes Academiques" (Commander of the Order of Academic Palms) award -- one of the oldest French civil distinctions, a statement said on Friday.



The honour will be conferred on Jadhav July 14, the French National Day.

A former vice chancellor of Pune University, Jadhav is also a member of the National Advisory Council, an academician and a writer.

He is the first Indian to be accorded the honour originally founded by Napoleon Bonaparte in 1808. In 1955, it was established as an order and awarded to eminent academicians, authors, artists, scientists and professionals for their contribution in various fields. *IANS*

Sakal Times
25/6/11.

# 'बिहारी बाबू' निरुपमचे मराठीप्रेम !

## गोराईत प्रथमच मराठमोळा साहित्य महोत्सव

## डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन


**मुंबई,** दि. २८ (प्रतिनिधी) - बिहारी बाबू म्हणून प्रसिद्ध असलेले उत्तर मुंबईचे काँग्रेसचे खासदार संजय निरुपम यांचे बिहार प्रेम जगजाहीर आहे. पण सध्या या बिहारी बाबूंचे 'मराठी प्रेम' हा चर्चेचा विषय ठरत आहे. खासदार संजय निरुपम यांच्या वतीने बोरिवली येथील गोराईत भव्य असे मराठी साहित्य ग्रंथ प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. २९ मे रोजी या ग्रंथ प्रदर्शनाला सुरुवात होणार असून हा मराठामोळा साहित्य महोत्सव पाच दिवस चालणार आहे. रविवार, २९ मे रोजी गोराई येथील नालंदा महाविद्यालयाच्या प्रांगणात केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे.

नालंदा महाविद्यालयापासून ग्रंथ दिंडीने या कार्यक्रमाला सुरुवात होणार आहे. या महोत्सवाच्या पाचही दिवशी साहित्यिक, ग्रंथ दिंडी, प्रगट मुलाखत, मराठी ग्रंथ प्रदर्शन, काव्योत्सव, हास्योत्सव, संवाद, सत्कार आणि कलाकारांच्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना मिळणार आहे. या महोत्सवात अभिनेते व दिग्दर्शक विनय आपटे यांची प्रकट मुलाखतही घेण्यात येणार आहे. तर सुप्रसिद्ध संगीतकार कौशल इनामदार व कवी अशोक बागवे यांच्या सुप्रसिद्ध गाण्यांच्या कार्यक्रमाचा आस्वाद लुटता येणार आहे. त्याचप्रमाणे बोरिवलीकरांना विनोदाची अस्सल कॉमेडी एक्स्प्रेस मेजवानीही यावेळी मिळणार आहे.

खासदार संजय निरुपम यांच्यासंकल्पेने या महोत्सवाचे आयोजन भूषण पाटील, संदेश कोंडविलकर आणि शिवानंद शेट्टी यांनी या महोत्सवाचे आयोजन केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रंगत आलेल्या मनसेच्या 'भय्या भगाव' युद्धाला या मराठी साहित्य महोत्सवामुळे पूर्णविराम लागेल का, अशी चर्चा सध्या मुंबईत रंगताना दिसत आहे.

नवशक्ति 29/6/11.

छोटीशी गोष्ट



## बसमध्ये आधी चढायचे


नरेंद्र जाधव आई-बाबांबरोबर काही कामानिमित्त दादरला गेले होते. वडाळ्याला घरी परतण्यासाठी दादरहून बस पकडायची होती. सर्व जण बसमध्ये चढले, पण जाधव यांना बसमध्ये चढण्यास मिळाले नाही. जवळ पैसेही नव्हते. त्यांना एक युक्ती सुचली, त्याच नंबरच्या बसेस ज्या दिशेने जातील त्या दिशेने चालायचे. त्यांच्या या चलाखीचे कौतुक होण्याऐवजी 'बस का चुकली?' म्हणून आईने मार दिला. तेव्हापासून कुठेही गेल्यास बसमध्ये आधी चढायचे असे त्यांनी ठरविले.

प्रहार
२६।११.

# डॉ.नरेंद्र जाधव यांना फ्रेंच सरकारचा सन्मान

मुंबई

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ.नरेंद्र जाधव यांना फ्रान्स सरकारचा अत्यंत मानाचा 'कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ ॲकॅडमिक पाम्स' हा पुरस्कार घोषित झाला आहे. या



पुरस्काराची घोषणा करणारे पत्र फ्रान्सच्या भारतातील वकिलातीने अलीकडेच जारी केले. फ्रान्सच्या स्वातंत्र्यदिनी म्हणजेच १४ जुलै २०११ रोजी हा किताब प्रदान केला जाणार आहे.

फ्रान्समधील मानाचा व सर्वात जुन्या बहुमानांपैकी असा असलेल्या या किताबाची सुरुवात फ्रेन्च सम्राट नेपोलियन बोनापार्ट याने १८०८मध्ये केली. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या तत्त्वांसाठी कार्य करणाऱ्या विचारवंतांना दिला जातो. हा पुरस्कार मिळवणारे डॉ. जाधव हे पहिले भारतीय आहेत. पुरस्कारामुळे स्फूर्ती मिळेल, अशी भावना जाधव यांनी व्यक्त केली.

मध्य.टाईम्स
२३/६/११

# डॉ. नरेंद्र जाधव यांना फ्रान्स सरकारचा पुरस्कार

सकाळ न्यूज नेटवर्क



डॉ. नरेंद्र जाधव


नवी दिल्ली, ता. २४ : नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांची फ्रान्सतर्फे देण्यात येणाऱ्या 'कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ ॲकॅडेमिक पाम्स' या प्रतिष्ठित अशा नागरी पुरस्कारासाठी निवड झाली आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांच्या प्रसाराचे काम करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो.

फ्रान्सच्या सरकारचे या आशयाचे पत्र येथील फ्रेंच वकिलातीतर्फे डॉ. जाधव यांना मिळाले आहे. फ्रान्सच्या स्वातंत्र्यदिनी म्हणजे १४ जुलैला त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. फ्रान्समधील प्रतिष्ठित असा हा नागरी पुरस्कार मानला जातो. नेपोलियन बोनापार्ट यांनी १८०८ मध्ये या पुरस्काराची सुरवात केली, असा त्याचा इतिहास सांगितला जातो. विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या जगभरातील नामवंतांना या पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

सकाळ

२५/६/११

# नरेंद्र जाधव यांना फ्रान्सचा पुरस्कार



नवी दिल्ली, दि. २४ – नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांना 'कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ ॲकॅडमिक पाम्स' हा फ्रान्स सरकारचा पुरस्कार घोषित करण्यात आलेला आहे.

समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्वांच्या प्रसाराचे काम करणाऱ्या नामवंत व्यक्तींना हा पुरस्कार देण्यात येतो. फ्रान्सच्या स्वातंत्र्यदिनी १४ जुलै रोजी हा पुरस्कार डॉ. नरेंद्र जाधव यांना प्रदान करण्यात येईल.

नेपोलियन बोनापार्ट यांनी १८०८ मध्ये या पुरस्काराची सुरुवात केली. शिक्षण, संशोधन, समाजकार्य, क्रीडा, संस्कृती या क्षेत्रात कार्य करणाऱ्या जगभरातील नामवंतांना हा पुरस्कार देण्यात आलेला आहे.


इमेज मेकर्स

लो. वार्ताहर २५/६/११

# डॉ. नरेंद्र जाधव यांना फ्रेंच सरकारचा 'कमांडर' किताब जाहीर

पुणे, दि. २५ (प्रतिनिधी) - फ्रान्स सरकारच्या वतीने देण्यात येणारा 'कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ अकॅडमिक पाल्मस्' हा मानाचा नागरी पुरस्कार भारताचे डॉ. नरेंद्र जाधव यांना नुकताच जाहीर झाला आहे. फ्रान्सच्या भारतातील वकिलातीकडून या पुरस्काराची अधिकृत घोषणा करणारे पत्र नवी दिल्ली येथील संबंधित कार्यालयाला मिळाले आहे.

फ्रान्स मधील सर्वांत जुना आणि महत्त्वाचा मानला जाणारा हा पुरस्कार असून, सन १८०८ मध्ये फ्रेंच सम्राट नेपोलियन बोनापार्ट यांनी



या पुरस्काराची घोषणा (स्थापना ) केली. हा पुरस्कार स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांसाठी तसेच शिक्षण, संशोधन, सामाजिक कार्य, क्रीडा व संस्कृती आदी विविध क्षेत्रात कार्य करण्याऱ्या जगभरातील विचारवंतांना दिला जातो. जगभरातील अनेक दिग्गजांना, विचारवंतांना आतापर्यंत हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. भारतातील विचारवंतांना हा पुरस्कार मिळवून देणारे डॉ. जाधव हे पहिले भारतीय आहेत. फ्रान्सच्या स्वातंत्र्यदिनी अर्थात १४ जुलै रोजी हा पुरस्कार डॉ. जाधव यांना प्रदान करण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर मिळालेल्या या पुरस्कारामुळे विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्यांना स्फूर्ती मिळेल, असे मत डॉ. जाधव यांनी व्यक्त केले आहे.

प्रभात
२६/६/११

News Paper Name :- Bulsiness Standard

News Paper Date :- 16 Jun 2011

Business Standard 16 Jun 2011

# 'Reforms in skill development and training are crucial'

Q&A

**NARENDRA JADHAV**
Member, Planning Commission

*India's growth story is supposed to scale a new high, with annual GDP growth of 9-9.5 per cent during the 12th Plan — provided skilled development and reforms in the education sector go hand in had. Edited excerpts of an interview by **Sanjay Jog** with Planning Commission member* NARENDRA JADHAV *on the subject:*

**India's record in education, especially vocational education and skill development, is dismal compared with other countries. What is being done to address this?**


We are on a high growth path and for this to be sustainable, skill development and reforms in the education sector are crucial. If we do not put our house in order, the demographic dividend will turn into a nightmare.

There is a three-fold framework in the form of a National Skill Development Council headed by the Prime Minister, a National Skill Development Coordination Board to coordinate 17 ministries engaged in skill development, headed by the deputy chairman of the Planning Commission, and the National Skill Development Corporation, a public-private partnership (PPP). This apart, state-level skill development missions have also been launched. Seven regional conferences have been held and there is widespread awareness at state level.

The focus of the 12th plan is on faster, more inclusive and sustainable growth. The manufacturing sector, currently growing at around eight per cent, needs to grow at 11-12 per cent each year, so that there would be creation of at least two million jobs annually. For large employment generation, certain sectors such as textiles, gems and jewellery, food processing, leather and garments will have to be focused on. During the 12th Plan, it is expected that 1.2 per cent of GDP investment would be made in health, education and skill development. In addition 0.7 per cent GDP investment is expected in infrastructure, which includes irrigation, urban infrastructure and transportation. The total investment in infrastructure is expected to be even larger, with increased emphasis on PPP.

**India's track record of vocational education is also poor.**

Emphasis is being given on massive vocationalisation of secondary education. Instead of the present format of such a training in 11th and 12th standards, consideration is being given to provide vocational education early on, say from the 9th and 10th standards. In 2007-08, a paltry two per cent went into formal vocational education and eight per cent was accounted for by on-the-job training and other informal ways. This is certainly not enough when compared with other countries; in Korea, it is 93 per cent. Just last week, at the meeting with state education ministers, the government has presented a draft National Vocational Education Qualification Framework, to provide horizontal and vertical mobility in vocational education.



The government is also in the process of setting up a committee to look into provision of credit support from the banking sector for skill training. This is crucial, since the construction sector (real estate and infrastructure) has a potential to create as many as 35 million jobs during 2012-22. In addition, 11.8 million in health, 9.6 million in tourism and hospitality, and 9.2 million in information technology and IT-enabled services during the same period. Accordingly, the sector-wise plans for these sectors are being prepared by National Skill Development Corporation.

**We also lack attention on apprenticeship programmes, compared with other countries. How are the government and the Commission looking at this?**

The proportion of apprenticeship is merely 0.02 per cent, which means only 240,000 of the total population of 1.2 billion get an apprenticeship. In Germany, it is 75 per cent, Australia has 66 per cent and Singapore, 60 per cent. The apprenticeship programme is a spectacular failure. A committee headed by me had suggested amendments to the Apprenticeship Act of 1961. The amendments, when done, will give a much-needed fillip to apprenticeship.

Further, we have 1,300 modular employment skills against 4,000 in China. We need to streamline funding. Besides, cluster-specific modular skills will be set up across the country. For example, an auto cluster could be planned in Chennai and a textile cluster in Surat.

**What is the government doing on skill development for the excluded?**

This is a critical issue. Incidentally, the National Advisory Committee chaired by Sonia Gandhi has recently set up a working group on the issue. A consultation with community-based organisations or non-government organisations is being arranged in July to discuss the issues and prepare a national policy for consideration of the government.